# छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था, पुणे

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)

सत्यमेव जयते

सारथी

बालचित्रवाणी इमारत , गोपाळ गणेश आगरकर रोड, सेनापती बापट रोडच्या मागे, पुणे (महाराष्ट्र) - ४११००४

Email ID sarthipune@gmail com | CIN- U74999PN2018NPL177394 | Website www sarthi-maharashtragov in | 020-25592502

ई-मेल : **skillsarthipune@gmail.com** **(CIN-U74999PN2018NPL177394)**

संकेतस्थळ : **www.sarthi-maharashtragov.in** दूरध्वनी क्र. **020-25592502**

## "महाराणी सईबाई सारथी रोजगार व स्वयंरोजगार कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम"

'सारथी' संस्थेमार्फत आयोजित कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत मराठा, कुणबी, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी या सारथीच्या लक्षित गटाच्या १८ ते ४५ या वयोगटातील उमेदवारासाठी सारथी संस्थेमार्फत "महाराणी सईबाई सारथी" रोजगार व स्वयंरोजगार योजनेंतर्गत **नि:शुल्क** कौशल्य विकास प्रशिक्षण देण्यात येणार आहे. लक्षित गटातील पात्र व इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर प्रशिक्षणासाठी ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी सारथी संकेतस्थळ खुले करण्यात आले असून अर्जदारांनी ऑनलाईन अर्ज भरावा. प्राधान्यक्रमाने महिला उमेदवारांची निवड या प्रशिक्षणाकरिता करण्यात येईल. पुरेशा प्रमाणात महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास उर्वरित प्रशिक्षणार्थी म्हणून पुरुष उमेदवारांची निवड करण्यात येईल.

सदर प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग पुणे टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटी (COEP) यांचे मार्फत अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण सारथीच्या लक्षित गटातील (मराठा, कुणबी, कुणबी- मराठा व मराठा-कुणबी) उमेदवारांकरिता देण्यात येणार आहे. सदर प्रशिक्षण अंतर्गत निवड करण्यात आलेल्या कोर्सेसची यादी सारथी संकेतस्थळावर http://sarthi-maharashtragov.in.>NoticeBoard> प्रसिद्ध करण्यात आली आहे. ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी सारथीच्या संकेतस्थळास भेट द्यावी.

तसेच, सारथी कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमाविषयी भविष्यात कोणतीही माहिती/सूचना उपरोक्त लिंक वरच दिली जाईल. वृत्तपत्रात जाहिरात दिली जाणार नाही. उमेदवारांनी सारथीच्या उपरोक्त संकेतस्थळावर सूचनाफलक पहावे.

Ashokkakade

**श्री. अशोक काकडे, (भा.प्र.से.)**

**व्यवस्थापकीय संचालक, सारथी, पुणे.**